# आजोबांच्या गोष्टी



**धीरेन सेन दादू**

लक्ष्यवेधी प्रकाशन
प्रचार सेवानिधी रू.२१

# अनुक्रमणिका

१.खोडकर नारायण ..........................४
२.कसाई .......................५
३.भारताचा आंतरिक भावार्थ ..................७
४.सुवर्णमुद्रांचा घडा ..................९
५.अपरिपक्व वैराग्य .....................१२
६.चेटकीणीची माया ................१५
७.प्रेमाचा कर ....................१८
८.लोभ ..................२०
९.शत्रुकडून मिळालेली भिक्षा .......................२२
१०.काळ्या योद्धयाची गोष्ट ...................२५
११.पन्ना दाई ......................... २७
१२.बिरबल १ .................. २९
१३.बिरबल २ ........... ३०
१४.बिरबल ३ .......... ३१

# खोडकर नारायण



भगवान शंकर हिमालयाची कन्या पार्वती हिच्याशी विवाह करणार होते. वरपक्षाकडे देवता होत्या, काही साधू होते व मान्यवर होते. नारायण प्रमुख पाहुणे होते. नवऱ्यामुलाचे पारंपारिक पद्धतीने मुलीची आई दाराशी स्वागत करते. हिमालयाची पत्नी मेनका हिने वराची नजर उतरवली. त्याचे औक्षण केले. भगवान शंकर शांतपणे हालचाल न करता दाराशी उभे होते. आपल्या आजुबाजुला काय चालले आहे याची त्यांना अजिबात फिकीर नव्हती. नारायणांच्या डोक्यात नेहमीच काही तरी खोडकरपणाच्या कल्पना असत. त्यानी शंकराची थोडीशी गम्मत करायचे ठरविले. त्यांनी आपले वाहन गरुडाला बोलावले. गरुड आल्याबरोबर आजुबाजूचे साप पळून गेले. भगवान शंकराना एका सर्पासारख्या पट्ट्याने कमरेला बांधलेल्या व्याघ्रचर्मा वाचून दुसरे कोणतेच वस्त्र नव्हते. तो कमरेचा सर्पही पळून गेल्यामुळे ते व्याघ्रचर्मही सैल झाले व गळून पडले. त्या बिचाऱ्या सासुची फार पंचाईत झाली. नारायण, नारायण असे म्हणत हातातील दिवे विझवून टाकले. भगवान शंकरांबरोबर आलेली भुते आनंदाने जयघोष करत नाचू लागले. नारायणांचे हे खोडकर कृत्य तुम्ही पाहू शकता अशा बाबतीत ते चांगलेच वाक्‌बगार आहेत.

* * *

# कसाई

ते एक पाच जणांचे सुखी कुटुंब होते. त्यात आई-वडील व तीन मुलगे होते. त्यातील दोन मुले मोठी होता. एक मात्र अगदीच लहान होता. त्या मुलांच्या सर्व गरजा नीट भागवल्या जात असत. त्यांचे आयुष्य संपन्न व सुखवस्तू होते. आयुष्यात फारच कमी समस्या होत्या. एक दिवस त्यांच्या वडिलांना एक जंगली कोंबडा मिळाला. त्यांनी तो कापून शिजवायचे ठरवले. त्यांनी तो कोंबडा घराच्या गच्चीवर नेला. तो कोंबडा फडफड करु लागला, प्रतिकार करु लागला. परंतु त्याने तो खूप जोरात दाबून मारुन टाकलाच. गच्चीवर त्याची दोन मुले खेळत होती. त्यांनी ते पाहिले. वडिलांनी तो मेलेला कोंबडा धुवून, साफ करुन शिजवण्यासाठी खाली नेला. त्यांनी ती रक्ताने माखलेली सुरी गच्चीतच ठेवली. त्या दोन मुलांपैकी मोठ्या मुलाने सुचवले की आपण कसाई कसाई खेळ खेळूया. त्याने ती सुरी घेऊन आपल्या लहान भावाचा गळा चिरुन टाकला. लहान भाऊ जेव्हा भयंकर ओरडू लागला, त्याचे भळभळणारे रक्त पाहिले तेव्हा मोठ्या भावाला आपण काही तरी भयंकर कृत्य केल्याची जाणीव झाली व तो भेदरला. हातातील सुरी मागे लपवून मागे मागे जाऊ लागला. ते जून्या पद्धतीचे बांधलेले घर होते. त्याच्या गच्चीला कठडा नव्हता. तो तसाच अगदी टोकाशी गेला व रस्त्यावर पडला. ती सुरी त्याच्या पाठीत खुपसली गेली आणि तो तेथेच गतप्राण झाला. त्यावेळी त्याची आई छोट्या भावाला एका टबमध्ये आंघोळ घालत होती. जेव्हा तिला आपल्या मोठ्या मुलाची प्रचंड किंकाळी ऐकू आली. ती छोट्या बाळाला तेथेच टाकून गच्चीवर पळाली. घाबरलेले वडीलही आईच्या मागोमाग पळाले. रक्ताच्या थारोळ्यात त्यांचा मुलगा पडलेला त्यांनी पाहिले. त्याने तडफडत त्यांच्याच समोर अखेरचा श्वास



घेतला व तो गतप्राण झाला. ते तसेच गोंधळलेल्या अवस्थेत आपल्या छोट्या बाळाकडे आले. तेथे पहातात तो काय त्यांचे गोजीरवाणे निष्पाप बाळ त्या भरलेल्या टबच्या तळाशी गतप्राण होऊन पडले होते.

एवढ्या थोड्या अवधीत इतके भयंकर नाट्य कधीच कोणी सादर करु शकले नसेल. त्या जंगली कोंबड्याच्या शापामध्ये नक्कीच काहीतरी शक्ती असणार. त्याने त्याच्या मृत्यूचा सूड उगवला. त्याला मारण्याची झोप व मनःशांती त्याने कायमची नष्ट केली.

* * *

# भारताचा आंतरिक भावार्थ

एक विदेशी पाहुणा वाण्याच्या दुकानासमोर उभा राहून तेथे काय सुरु आहे हे जाणण्याचा प्रयत्न करत होता. त्याने पाहिले की एक लहान मुलगा गिऱ्हाईकांशी बोलणाऱ्या व दुकान चालविणाऱ्या एक मध्यवयीन माणसाच्या आजूबाजूला खेळत होता व एक चष्मा लावलेला वयोवृद्ध माणूस एक जाडजूड पुस्तक वाचत होता. त्याने त्या वयस्कर माणसाजवळ जाऊन तो काय वाचत आहे याबाबत विचारले, तो म्हणाला, "थोर महाकाव्य रामायण." त्या पाहुण्याला महान ग्रंथाबाबत व भारतीय संस्कृतीबद्दल थोडीफार माहिती होती. त्यामूळे तो पुस्तकाबाबात आणखी माहिती विचारु लागला. वयस्कर माणसाने सांगितले की, प्रभू रामचंद्रांचे सैनिकी अभियंते कन्याकुमारी ते लंकेला जोडणारा तरंगणारा सेतू बांधत होते. तो मध्यमवयीने माणूस त्याचा मुलगा व तो लहान त्याचा नातू असल्याचे त्याने सांगितले. थोड्याशा अनौपचारिक संभाषणानंतर तो पाहुणा निघून गेला. सुमारे ३० वर्षानंतर जगात अनेक बदल झाले व तो पाहुणा पुन्हा एकदा भारतात आला. कुतुहलाने तो पुन्हा त्या गावात आला. त्या वाण्याचे दुकान अजूनही तेथेच होते. त्याला आश्चर्य वाटेल की त्याच जणांचा समूह अजूनही तसाच दिसला. दुकान चालविणाऱ्या मध्यमवयीन माणसाभोवती खेळणारा लहान मुलगा व सैनिक अभियंत्यांच्या बांधकामाचे कौशल्य वाचणारा चष्मा लावलेला वयस्कर माणूस. पाहण्याने त्या म्हाताऱ्या व्यक्तीला विचारले, "तीस वर्षानंतरही तुम्ही मोठे झाला नाहीत का? आणि तुमचे सेतूच्या बांधकामाचे वर्णन करणारे प्रकरण अजूनही वाचून झाले हे कसे काय शक्य आहे? एवढ्या मोठ्या कालावधीत दुकानदार व मुलामध्ये काहीच बदल कसा झाला नाही?" म्हाताऱ्या व्यक्तीने त्याचा चष्मा कपाळावर नेला व तीस वर्षांपूर्वी



दुकानाला भेट देऊन आतासारख्याच घटना तेव्हा बघितल्याचे सांगून प्रश्न विचारणाऱ्या त्या माणसाला समजून घेण्याचा प्रयत्न करु लागला. कोणताही बदल कसा झाला नाही याचे त्यालाही आश्चर्य वाटेल. आता या वयस्कर व्यक्तीला त्या पाहुण्याचा गोंधळ लक्षात आला आणि त्याने त्याला समजाविले की त्याची चूक होत आहे. "पूर्वी तुम्ही पाहिलेली वयोवृद्ध व्यक्ती म्हणजे माझे स्वर्गीय वडील होते. मी तो दुकानदार होतो आणि खेळणारा लहान माझा पुत्र होता. आता मी निवृत्त झालो आहे. माझा मुलगा दुकान पहातोय व इथे खेळणारा मुलगा हा त्याचा पुत्र आहे." आता त्या पाहुण्याच्या डोक्यात प्रकाश पडला व त्याला नव्यानेच भारताचा शोध लागला.

काळपरत्वे भारताचे बाहेरील आवरणांचे रंग बदलताना दिसतात. पण त्याचा आंतरिक भावार्थ तोच रहातो. शाश्वतकाळापासून येथील प्रत्येकजण या परंपरेतून आलेला आहे. रंगमंचावर आपली वेळ पूर्ण झाल्यावर पुढील पिढीला तो आपल्या परंपरा त्यांच्या पुढच्या पिढीला त्यांना त्या हस्तांतरीत काराव्यात म्हणून देतो आणि मग तेथून निघून जातो.

* * *

# सुवर्णमुद्रांचा घडा

महेश हा एक अतिशय कंजूष माणूस होता. तो त्याच्या वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याला सुवर्णमोहोरांचा एक घडा वारशाने मिळाला होता. तो स्वतःला या पुंजीचा मालक नाही तर फक्त रखवालदार समजत असे. त्याने स्वतःच्या सुखासाठी जरी त्या साठ्यातील एकही मोहोर खर्च केली तर त्यामुळे त्याला आनंद होण्याऐवजी दुःखच होत असे. त्याची ही अतिकाटकसरी वागणूक असह्य झाल्यामुळे त्याचा एकुलता एक मुलगा त्याच्या कुटुंबासह दुसऱ्या गावी निघून गेला. त्यांनी एकमेकांना पुढे दहा वर्षे पाहिलेही नाही. या मधल्या काळात म्हातारा झालेला महेश अतिशय वाईट स्थितीत जगत होता. कारण मदत मागण्याच्या बाबतीतही अतिशय काटकसरी होता. एक दिवस त्याने त्याच्या घराजवळून जाणाऱ्या साधारण बारा वर्षाच्या मुलाला पाहिले. त्याने त्या मुलाला आत बोलाविले आणि त्याचा स्वयंपाकी व निरोप्या असे काम करण्याच्या बदल्यात त्याला अन्न व आसरा देण्याचे कबूल केले. दंगेखोरपणा व खट्याळपणा केल्याने वडिलांनी घरातून हाकलून दिलेल्या त्या मुलालाही खरोखर त्याचीच गरज होती. अशाप्रकारे दोघांनाही सुविधांच्या दृष्टिने हा योगायोग घडला व ते त्या एकत्र राहू लागले.

धूर्त व कपटी महेशच्या मनात नवीन कल्पना येऊ लागल्या. तो म्हातारा होऊ लागल्याने आपल्या लपविलेल्या संपत्तीचे काय करावे याचा तो विचार करु लागला. त्याच्या मृत्यूनंतर चुकीच्या हातात ती संपत्ती पडण्याच्या शक्यतेचा विचारसुद्धा त्याला वेडापिसा करणारा होता. या दरम्यानच्या काळात त्याच्या मुलाला सुद्धा कुठेच पत्ता नव्हता. आता तो एक अपूर्व कल्पना लढवू लागला. तो त्या मुलाला प्रलोभन दाखवू लागला. तो त्या मुलाला म्हणाला की, जर तो त्याच्याशी प्रामाणिक व

एकनिष्ठ राहिला तर तो त्याला त्याच्याकडची लपविलेली संपत्ती देईल. तसेच त्याने ही गोष्ट पूर्णपणे गुप्त ठेवली पाहिजे. या सगळ्या गोष्टींना तो मुलगा पूर्णतः तयार झाला. एकदा आशेला लागून राहिलेली ती संपत्ती कधी मिळेल याची तो मुलगा वाट पहात होता. कारण त्यानंतर त्या असहाय्य म्हाताऱ्याला कसे फसवायचे हे तो चांगला जाणत होता.

गावाबाहेर एक मोडकळीस आलेले जुने मंदिर होते. त्या ओसाड मंडिरात कोणतीही मूर्ती नव्हती. त्या मंदिराला तळघर होते. पण खाली उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्यांशी नासधूस झाली होती. शिडीशिवाय कोणीही खाली उतरु शकत नसे. हे गुपित फक्त महेशलाच माहिती होते. त्याच्या योजनेचा पूर्ण विचार केल्यावर एका अंधाऱ्या रात्री महेशने तो मोहरांनी भरलेला घडा मंदिरात नेला व तळघरात ठेवला. आता त्या मुलाला तेथे घेऊन जाणे व त्याला फसवून अडकविणे एवढेच बाकी होते. त्याने त्या मुलाला सांगितले की त्याला तो त्या लपविलेल्या संपत्तीशी घेऊन जाईल व शेवटी ती त्याला सुपुर्द करेल. पण त्याने सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक पालन केले पाहिजे. त्या मध्यरात्री ते दिवा व शिडी घेऊन एकत्र मंदिरापाशी गेले. ते मंदिराच्या आतमध्ये व नंतर खाली तळघरात गेले. नंतर त्याने त्या मुलाला हे वाक्य सतत म्हणायला सांगितले, ‘‘मी येथे कायमस्वरुपी राहून संपत्तीचे रक्षण करेन व कधीही त्याला सोडून जाणार नाही.’’ सोन्याच्या मोहोरांनी डोळे दीपून गेल्याने अधीर व उतावीळ झालेला तो मुलगा तयार झाला व त्याला जे काही सांगितले गेले ते त्याने केले. वरुन कीतरी आणण्यास जातो असे सांगून महेशने त्याला तिथेच थांबायला सांगितले. तो दिवा घेऊन वर गेला व अचानकपणे त्याने शिडीही ओढून घेतली. तळघरात पूर्णपणे काळ्याकुट्ट अंधारात एकटाच असलेल्या त्या मुलाला अनामिक भीतीने ग्रसाले. तो मोठमोठ्या आवाजात महेशला हाका मारु लागला. महेशने त्या तळघराच्या तोंडावर

अक दगडी शिळा ठेवली. शक्य तितक्या मोठ्या आवाजाने ओरडणारा तो मुलगा आता अतिशय घाबरला. त्याला फक्त त्याचाच प्रतिध्वनी ऐकू आला. गुदमरुन, उपासमारीने व त्याहून अधिक म्हणजे भितीने तो मरणार हे नक्कीच त्याचे रक्षण करणारा होता. या घटनेनंतर सुमारे चार-पाच दिवसाना पूर्वी हरविलेला महेशचा मुलगा त्याच्या वडिलांना शोधत आला. त्याने महेशला विचारले की दहा वर्षापूर्वी लहान बाळ म्हणून पाहिलेला त्याचा मुलगा त्याचे घर साधारण एक महिन्यापूर्वी सोडून गेला. त्याच कोणताच भांगपत्ता नसून त्याला महेशने पाहिले आहे का? पळालेल्या मुलाचे वर्णन, त्याची अंगकाठी, स्वभाव डाव्या डोळ्यावरील व्रण व हनुवटीवरील डाव्या बाजूच्या लाल तीळ हे वर्णन पाहून महेशला खात्री पटली त्याच्याबरोबर काही महिने राहिलेला मुलगा म्हणजे त्याचा नातू होता. ते वर्णन संपण्यापूर्वीच महेशला अतिशय धक्का बसला. कारण त्याला खात्री पटली की, त्याने स्वतःच्या नातवालाच



ठार मारले. याचा परिणाम असा झाला की मरेपर्यंत तो परिचित वा अपरिचित अशा प्रत्येक व्यक्तीला विचारत फिरु लागला कि त्यांनी ती किंकाळी ऐकली होती का? ती भेदक, असहाय, हृदयविदीर्ण करणारी किंकाळी त्याच्या कानात, डोक्यात, मनात मरेपर्यंत धगधगत्या आगीप्रमाणे भडकत राहिली.

* * *

# अपरिपक्व वैराग्य

साधुचरण हा त्याच्या तरुणपणापासूनच विरागी व तत्त्वचिंतक असा होता. तो आपण चांगलं दिसावं म्हणून कधीच प्रयत्नशील नसे. उलट एकांतात कुठेतरी निरुद्देशपणे आभाळाकडे प्रयत्नशील नसे. उलट एकांतात कुठेतरी निरुद्देशपणे आभाळाकडे बघत बसे. गर्दी व गोंगाटापासून तो नेहमीच दूर रहाण्याचा प्रयत्न करी. त्याचबरोबर त्याचे जवळचे नातेवाईक, इत्यादी त्याच्या संबंधी जे काही करत त्याला तो विरोधही करत नसे. प्रतिकारही करत नसे. म्हणून त्याच्या माता-पित्यांनी त्याचा विवाह सोहोळ्यातील सर्व विधींमध्ये ती अलिप्तपणेच सहभागी झाला आणि पत्नीविषयी कोणत्याच प्रकारची ओढ नसूनही तो गृहस्थ बनला व याच पद्धतीने त्याने आपले जीवन व्यतीत केले. मंध्यतरीचे काळात त्याला एक कन्या व पुत्र प्राप्त झाला आणि लौकरच त्याला हे घर व भौतिक भोगांचा त्याग करुन भगवंताच्या प्राप्तीची ओढ लागली. त्याला कौटुंबिक प्रेम, जिव्हाळा याविषयी काहीच ओढ उरली नाही. एक दिवस तो आपल्या घराचा त्याग करून संन्यासी झाला. त्याच्या पत्नीने व कुटुंबियांनी त्याच्या परत येण्याची खुप वाट पाहिली, परंतु त्यांच्या पदरी निराशाच आली. अखेरीस त्यांनी मनाशी या गोष्टीशी स्वीकार केला की त्याने चांगल्या गोष्टीसाठीच त्यांचा त्याग केला होता.

कालांतराने त्याची दोन्ही मुले तरुण झाली व कायद्यानुसार घराची व जमिनीच्या काही भागाची मालकी त्यांच्याकडे आली. ही अटळ अशी नियती त्याच्या पत्नीनेही मुकाटपणे स्वीकारण्यास तयार केले. एवढे सगळे घडल्यानंतर एक दिवस सर्वांना आश्चर्याचा धक्का देते साधुचरण घरी परत आला. कुटुंबियांची प्रतिक्रिया ही संमिश्र स्वरुपाची होती. आपला पती परत आल्यामुळे पत्नी आनंदात होती. परंतु कुटुंबात

होणाऱ्या गुंतागुंतीची तिला जाणीव व काळजीही होती. त्याच्या कन्येला मात्र अगदी निर्भेळ असा आनंद झाला. मुलालाही दुःख झाले नाही. परंतु आपल्या मालकी हक्कावर परिणाम होईल किंवा कसे याबाबत तो साशंक झाला. साधुचरण संन्यासी असल्यामुळे घरात प्रवेश करु शकत नव्हता त्यामुळे घराच्या बाहेरील भागातील एक खोली जी हा मुलगा आपल्या मित्रांशी गप्पा मारण्यासाठी वापरत होता तीच मोकळी करुन द्यावी लागली. घराच्या कुढल्याच बंधनात न अडकता साधुचरणला त्या घरात रहायचे होते, की ज्या योगे संन्यासी जीवनाचे पावित्र्य तसेच त्याचे आध्यात्मिक जीवन त्याला अबाधित ठेवता येईल. मुलगा मनात नाराजी असूनही गप्प राहिला. तरीही पुढे काही क्षुल्लक तर काही गंभीर समस्या उद्‌भवत राहिल्या. त्याची कन्या उपवर झाली. तिला विवाहासाठी ठिकाणे सांगून येऊ लागली. एका श्रीमंत वराचे स्थळ चांगले होते. परंतु साधारणला समजले की तो मनुष्य नास्तिक होता. त्यामुळे त्याने ते स्थळ नाकारले. त्याच्या दृष्टिने एखाद्या नास्तिक सैतानाशी संबंध ठेवणे मूर्खपणाचेच होते. त्याची पत्नी व पुत्र दोघेही त्याच्या या निर्णयामुळे नाराज होते. परंतु त्यांना तो निर्णय स्वीकारावाच लागला.

एकदा त्यांच्या शेजारच्याच एका शेतकऱ्याने त्याच्या शेताचा कर भरला नाही. अगदी उशिराची मिळालेली वेळही टळून गेली. तरी तो शेतकरी बेसावधच राहिला. अज्ञानामुळे व निष्काळजीपणामुळे त्याचे नाव करचुकव्यांच्या यादीत समाविष्ट झाले व त्याच्या जमिनीचा लिलाव झाला. साधुचरणच्या मोठ्या पुत्राने ती जमीन रीतसर कायदेशीर तरतुदी करुन विकत घेतली. शेजारच्या शेताचा तो मालक झाला.

मात्र ही गोष्ट त्या निष्काळजी शेतकऱ्याला अजिबात सांगितले नाही. त्या शेतकऱ्याने त्या शेताची मशागत केली. पेरणी केली. त्या शेतात पीकही तयार झाले. मात्र पीक कापणीला आल्यानंतर त्या नव्या



मालकाने (साधुचरणच्या मुलाने) त्याची कापणी सुरु केली. त्या अज्ञानी शेतकऱ्याने त्याला विरोध करायचा प्रयत्न केला. परंतु नव्या मालकाने त्याला दाद दिली नाही. त्या अचंबित झालेल्या निराश शेतकऱ्याने अखेरीस आपली बाजू साधुचरणपुढे मांडली व आपले संरक्षण करण्याची विनंती त्याला केली. साधुचरण हा नीतिमान मनुष्य असल्याने स्वाभाविकच त्याने त्या शेतकऱ्याची बाजू घेतली. परंतु त्याच्या मुलाने सर्व व्यवहार कायद्याच्या चौकटीत व्यवस्थित केला असल्याने आपली बाजू नीट मांडली व कायद्याने त्या शेतकऱ्याचे अज्ञान हे त्याला सवलत देण्याचे कारण ठरु शकत नाही हे मान्य करुन साधुचरणच्या मुलाच्या बाजूने निकाल दिला. तो शेतकरी हताश झाला. साधुचरणला आपल्या चुकीची जाणीव झाली. योग्य वेळेधारी घर सोडून गेल्याचा त्याला पश्चात्ताप झाला. आणि घरी परतण्यात आपण केवढा घोर मूर्खपणा केला, केवढी चूक केली हेही त्याला उमजले व त्याच रात्री घोर अंधःकारात स्वतःला झोकून देऊन तो घर सोडून निघून गेला.

* * *

# चेटकीणीची माया

होमर या महान कवीने आपल्या इलियड आणि ओडिसी या महाकाव्यात अनेक सुंदर आणि उपदेशात्मक प्रकरणे वर्णन केली आहेत. ट्रॉयच्या पराभवानंतर आणि हेलेनच्या प्राप्तीनंतर ग्रीक योद्धे आपल्या घरी परतण्याच्या वाटेवर होते. वादळाला बळी पडून त्यांची जहाजे विखुरली गेली आणि काही जहाजे ही मुख्य जहाजांपासून दूर निघून गेली. त्या जहाजांप्रमाणे ओडीसचे जहाजही होते. ते दहा वर्षे याप्रमाणे भरकटत राहिले. त्या काळात त्याला अनेक वैशिष्ट्यपूर्ण अशा प्रसंगांना सामोरे जावे लागले. ओडिससला पूर्वीपासूनच माहिती होते की तेथे एक चेटकीण रहात होती. ती आपल्या अतिशय मधूर गाण्यांनी खलाशांना आकर्षित करुन मारुन टाकत असे. त्याला या सर्व प्रकरणाबद्दल अत्यंत कुतूहल होते. त्यामुळे त्यात स्वतःच लक्ष घालायचे ठरवले होते. त्याने जहाजावरील सर्व खलाशांना एकत्र करुन त्यांना बारकाईने सर्व सूचना दिल्या. त्याने सांगितले की त्याने आता दिलेल्या सूचना या खऱ्या सूचना होत. त्यात गोंधळात टाकणाऱ्या वा नंतर लक्षात येणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करावे. त्याने सर्व खलाशांना आणि अधिकाऱ्यांना सांगितले की तो आता त्या सर्वांची कर्णरंध्रे पातळ मेणाचे थेंब घालून बंद करेल, त्यानंतर त्या सर्वांनी मिळून त्याला जहाजाच्या मध्यवर्ती खांबाला घट्ट दोरखंडांनी बांधून टाकावे आणि ते जहाज त्या दूर दिसणाऱ्या बेटाच्या भोवती वल्हवीत न्यावे. त्याच्या (ओडिससच्या) सर्व सूचनांचे योग्य पालन केले गेले आणि ते जहाज त्या गूढ अशा बेटाच्या दिशेने निघाले. ते जहाज जेव्हा

हाकेच्या अंतरावर पोहोचले तेव्हा ओडिससच्या कर्णांची रंध्रे खुली असल्याने आजपर्यंत ऐकलेल्या सर्व स्वरांपेक्षा अत्यंत मधूर असे स्वर (गीत) त्याच्या कानात शिरु लागले. तर त्याच्या खलाशांचे कान बंद केलेले असल्याने – बहिरे केलेले असल्याने काहीच ऐकू शकत नव्हते. त्या वेड लावण्याच्या सुरांच्या उगमापाशी पोहोचण्याची प्रबळ उर्मी ओडीससमध्ये निर्माण झाली. त्याने खलाशांना त्याला मुक्त करण्याची आज्ञा दिली. परंतु त्यांनी काही लक्ष दिले नाही. त्याने रागाने क्षुब्ध होऊन त्यांना भयंकर परिणामांची धमकीही दिली. परंतु से सर्व बहिरे केले गेल्यामुळे आणि पूर्वी केलेल्या सूचनांच्या आज्ञा पालनामुळे ओडीससच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करत राहिले. आपल्या मनाची प्रबळ इच्छा पूर्ण करु शकत नसल्याने त्याला तीव्र वेदनांना तोंड द्यावे लागले. त्याने त्याला बंधनातून मुक्त करण्यासाठी



खूप विनवण्या केल्या. परंतु काहीही उपयोग झाला नाही. हा संघर्ष आणि त्याचे हृदय भेदणाऱ्या त्या वेदना काही वेळा सुरु राहिल्या. परंतु ते जहाज हळूहळू दूर गेले आणि चेटकिणीच्या प्रभावातून मुक्त झाले. थकलेला आणि शांत झालेला आडिसस त्या बंधनातच कोसळला. त्याच्या पूर्व सूचनांप्रमाणे खलाशांनी त्याला बंधनमुक्त केले. हळूहळू तो पूर्वपदावर आल्यानंतर किती भयंकर संकटातून आपण वाचलो हे त्याला जाणवले.

कृष्णकृपेने आपल्या गुरुंच्या माध्यमातून आपणही जर त्या खांबावर दृढ विश्वास असेल तर असेच सुरक्षितपणे बांधलेले असतो. परंतु तरीही आपल्या अमर्यादा अशा इच्छा, वासना आपणास श्रीकृष्णांपासून दूर जाण्यास मोहित करीत असतात. आपणही अशा मनोरंजनाला आणि नाविन्याला भुलून धोक्यांना आणि अधःपतनाला आमंत्रण देतो आणि दुःखी होतो.

* * *

*※ चोर चोरु शकत नाही, सरकार धाड घालून जप्त करू शकत नाही, भावा-भावात वाटणी करणे शक्य नाही आणि ज्याचे ओझेही होत नाही. जे खर्च केले तरी वाढतच जाते असे भगवद्गीता रूपी धन ते सर्व धनात श्रेष्ठ होय.*

*※ बुद्धीमान माणसाने वय वाढल्यावरही मनःपूर्वक कृष्णभक्ती शिकली तर तिचे फळ या जन्मात मिळाले नाही तरी पुढील जन्मात ते सहज अवगत होईल.*

# प्रेमाचा कर



पूर्वीच्या काळीही हल्लीच्या आधुनिक पत्रकार परिषदा किंवा सार्वजनिक सभा असत. येशू ख्रिस्त देखील एकदा अशाच एका सार्वजनिक संमेलनात अडकले. ते त्या ठिकाणी भगवंतांच्या राज्याचा प्रचार करत होते. अशातच एक गर्दीतील व्यक्तिने एक प्रश्न येशू ख्रिस्तांना विचारला. त्याने विचारले की त्याने सिझरला कर भरावा की नाही? त्या धूर्त प्रश्नामागील हेतू येशू ख्रिस्तांना अडकविण्याचाच होता. त्याला येशू ख्रिस्तांना दांभिक ठरवायचे होते. जर येशू कर द्या असे म्हणाले तर देवाच्या राज्याची कल्पना खोटी ठरेल आणि जर येशू ख्रिस्त कर देऊ नका असे म्हणाले तर त्यांना मनगटाला धरुन

खेचत न्यायालयात घेऊन जाता येईल आणि त्यांना राजद्रोही ठरवता येईल असे त्या माणसाला वाटले. येशू ख्रिस्तांच्या लक्षात हा डाव आला. त्यांनी एक दिनार, त्या काळाचं एक नाणं मागितलं. त्यांनी ते नाणं उंच धरलं आणि विचारलं की त्या नाण्यावर कोणाचं डोकं आहे? या प्रश्नाला ते म्हणाले सिझरचं आहे. म्हणून त्यांनी असा सल्ला दिला की जे सिझरचं आहे ते सिझरला द्यावं आणि जे देवाचं आहे ते देवाला अर्पण करावे. शांतपणे आहे ती परिस्थिती स्वीकारण्यीशिवाय काही पर्यायच नव्हता. कारण त्यांचा पराभवच झालेला होता. सिझरला राज्यकारभार चालवण्यासाठी प्रजेकडून कराच्या रूपाने पैशाची गरज आहे. परंतु भगवंतांना या कशाचीच गरज नाही. ते फक्त आपल्या निष्कपट प्रेमानेच संतुष्ट होतात आणि उभयता ते निरपेक्ष आनंद उपभोगतात.

* * *

**ॐ स नाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्य करवावहै।**
**तेजस्वि नावधितमस्तु मा विद्विषावहै ।।**
**ॐ शातिः शांतिः शांतिः ।।**

हे भगवंता ! आम्हा दोघांचे गुरु-शिष्यांचे रक्षण करावे. आमचे पालन करावे. आम्ही दोघांनी सर्व प्रकारची शक्ती प्राप्त करावी. आम्ही केलेले अध्ययन दैवी आणि तेजस्वी होतो. आम्ही दोघांनी एकमेकांचा द्वेष करु नये.

# लोभ

प्रचंड जमिनीचा मालक असलेल्या जमीनदार एकदा एका टेकडीवर चढला. त्याने आपल्या डोक्यावरील टोपी हातात घेतली व जाहीर केले की जो कोणी टोपीभर पैसे मला देईल त्याला अगणित अशा जमिनचा मालक होण्याची संधी दिली जाईल. त्यासाठी त्याला एवढेच करावे लागणार होते की सूर्योदयाला त्या टेकडीच्या माथ्यापासून चालावयास सुरुवात करुन जास्तीत जास्त जमीन पादाक्रांत करुन संध्याकाळी सूर्यास्तापर्यंत त्या टेकडीवर परत यायचे होते. त्या संपूर्ण वेळात जेवढा भूभाग तो चालून पादाक्रांत करील तो सर्व त्याच्या मालकीचा होईल. ही गोष्ट अनेक लोकांना भुरळ पाडणारी होती. त्यांच्यातील एक महत्वाकांक्षी माणूस पुढे आला. त्याने आवश्यक तेवढी रक्कम जमा केली (दिली) व तो सांगितलेल्या अटीप्रमाणे चालू लागला. धनवान होण्याच्या, श्रीमंत होण्याच्या कल्पनेने तो खूप खूप होता. तो कल्पना करीत होता की या शेतात राई किती छान वाढते. हे गव्हाचं सुपीक शेत मला श्रीमंत करेल आणि येथे बार्ली पेरली तर छानच होईल. अशा तऱ्हेने तो मनातल्या मनात असा मजेदार स्वर्ग उभा करत चालत होता. जेव्हा तो थोडासा थकला तेव्हा त्याला एकाएकी जाणवले की मध्यान्ह टळून गेली आहे. फक्त एक दिवस थोडे जास्त कष्ट उपसण्याची त्याने स्वतःलाच प्रेरणा दिली,स्वतःलाच उत्साहित केले की भविष्यात तो सदैव खूप सुखात राहू शकेल. अशा तऱ्हेने त्याने अधिकाधिक जमीन पादाक्रांत करणे सुरुच ठेवले. त्याने स्वतःला स्वतःलाच सावध राहण्याची ताकीद दिली आणि सुर्य जेव्हा मध्यान्ह व क्षितीज यांच्यामध्ये आला तेव्हा पुढे न जाण्याची मानसीक तयारी त्याने केली आणि टेकडीच्या दिशेने वळून तो चालू लागला. परंतु तोपर्यंत तो खूपच थकलेला होता.



तो भराभरा चालत टेकडीच्या तळाशी पोहोचेपर्यंत पूर्णपणे दमला होता. तो निर्दयपणे मनातल्या मनात स्वतःलाच जणू चाबूक मारत होता. त्याच्या थकलेल्या पायांमुळे, धपापणाऱ्या छातीमुळे तो फार नाराज झाला होता. अशा दोन टोकाच्या क्षणाला त्याच्या शरीराने त्याच्याशी असहकार पुकारल्याचा त्याग राग येत होता. तो निर्दयपणे स्वतःलाच टेकडीच्या त्या सरळ चढावर खेचतच होता. अखेरीस तो टेकडीच्या माथ्यापर्यंत पोहोचला. तिथे तो माणूस हातात टोपी घेऊन अजूनही स्मितहास्य करीत बसलेला होता. जेव्हा सूर्य अस्ताला गेला आणि तो माणूस आत्यंतिक थकव्यामुळे धरणीवर कोसळला त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या. तो जमिनीवर पालथा पडला. त्याचा तांबडालाल झालेला चेहरा धुळीने माखला आणि तो गतप्राण झाला. त्याने दिवसभर उपसलेले सगळे कष्ट व्यर्थ गेले होते. तो आता फक्त त्याच्या दफनाला पुरेल एवढ्या जमिनीच्या छोट्याशा तुकड्यावरच हक्क सांगू शकत होता.

* * *

# शत्रुकडून मिळालेली भिक्षा

एक खूप श्रीमंत जमीनदार होता. त्याला लाला नावाचा एक मुलगा होता. लहानपणापासूनच लाला एक दयाळू व तत्त्वचिंतक असा मुलगा होता. मोठा होतानाच तो हळूहळू कृष्णभक्त बनला. एके दिवशी धोबी रहात असलेल्या एका खेड्यातून पालखीत बसून जात असता एक मुलगी आपल्या पित्याला आठवण करुन देताना ऐकले. ती म्हणत होती, बाबा दिवस मावळला तरी तुम्ही अजून बाशना जाळला नाही. 'बाशना' म्हणजे केळीची पाने आणि दुसऱ्या अर्थाने 'बाशना' म्हणजे वासना, इच्छा होय. लालाला ही जणू काही सुचनाच मिळाली की त्याचेही आयुष्य क्षीण होत आहे आणि तरीही क्षुद्र अशा भौतिक इच्छा तो अजूनही बाळगून आहे. एका क्षणात त्याने निर्धार केला की त्याच्या जवळ असलेल्या सगळ्या किमती वस्तूंचा त्याग करायचा आणि सर्व साधने, आराम आणि घर सोडून, सर्वस्वाचा त्याग करुन साधे संन्यस्त आयुष्य जगत कृष्णभक्ती करायची. कुठल्याही दिखाव्याशिवाय त्याने पालखी थांबवली, त्यातून तो बाहेर पडला, त्याने किमती वस्त्रे उतरवली, सोन्याचे दागिने, अंगठ्या इ. फेकून दिले आणि तो वृंदावनाची वाट चालू लागला. त्याने आपल्या गुरुंचा आश्रय घेतला. गुरुंनाही असा शिष्य मिळाल्याचा खूप आनंद झाला. लालाने गुरुंकडे दिक्षेची विनवणी केली की ज्या योगे कोणत्याही विलंबाशिवाय तो आपली भजन, भक्तिसाधना नीट करु शकेल. परंतू त्याच्या गुरुजींनी त्याला काही काळ थांबवण्यास सांगितले. तो रोज माधुकरी मागत दिक्षेचु वाट पाहू लागला. माधुकरी म्हणजे भिक्षाच

होय. भिक्षा मागून जे मिळेल त्यात संतुष्ट राहणे. असे अनेक दिवस लोटले तरीही त्याचे गुरु दिक्षेबाबत मौन बाळगून होते. लाला आचंबित होऊन विचार करु लागला की काय बरे त्या विलंबाचे कारण असेल? असे दर नसेल की त्याच्यात काहीतरी दोष असेल, काहीतरी त्रुटी असेल एखादी चूक दुरुस्त करावयाची राहिली असेल की ज्यामूळे दिक्षेला विलंब होत आहे? एकाएकी त्याच्या लक्षात आले की त्याच्या रोजच्या माधुकरीच्या फेरीत ज्या शेटजींशी त्याच्या कुटुंबाचे भांडण होते, त्यांच्या दारापाशी तो कधीच थांबला नाही. त्याने तेथे कधीच माधुकरी मागितली नाही. त्या दोन कुटुंबातील शत्रुत्व आणि भांडणे



जीवंत ठेवणारे अनेक खटले, दावे न्यायालयात सुरु होते. आणि त्यांच्यातील हे वर पिढ्यान् पिढ्या चालू होते. हे लक्षात आल्यावर लाला दुसऱ्याच दिवशी त्या शेठजीच्या दाराशी माधुकरी मागायला जाऊन उभा राहिला शेठजी लगबगीने फाटकाजवळ आले आणि त्यांनी लालाला गाढ आलिंगन दिले. आपल्या गदगदलेल्या आवाजात ते म्हणाले की, मी लालाएवढे माझे मन मोठे करु शकलो नाही की त्याच्या दारात जाऊन भिक्षा मागू शकेन. दोघेही एकमेकांना आलिंगन देत हुंदके देत राहिले. त्यांच्या डोळ्यामधून वाहणाऱ्या अश्रुंनी त्यांच्यातील वैर धुवून टाकले. तेवढ्या वेळात शेठजींच्या नोकरानी थाळ्यामध्ये फळे, मिठाई, पुऱ्या इ. रुचकर पदार्थ आणून ठेवले. परंतु लालाने मात्र एका माधुकरीने जेवढी भिक्षा स्वीकारली पाहिजे तेवढेच अन्न, अर्धी भाकरी घेतली. आणि तो तेथून गेला. दुसऱ्याच दिवशी लालाला आपल्या गुरुकडून दिक्षा मिळाली. वृंदावनला लालाने बांधलेले मंदिर अजूनही त्याच्या संन्यस्त विरागी जीवनाची साक्ष देत उभे आहे. एका फार मोठ्या संपत्तीचा मालक असलेल्या व्यक्तिने अगदी साधे विरक्त जीवन व्यतीत केले आणि वृंदावनात भक्तिभावाने भजन गात काळ व्यतीत केला.

* * *

**मूकं करोति वाचालं पङ्गुं लंघयते गिरिम्।**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्॥**

ज्यांच्या कृपेने मुका बोलू शकतो. पांगळा पर्वत ओलांडून जातो अशा परमानंदी भगवान माधवाना मी वंदन करतो.

# काळ्या योद्धयाची गोष्ट

ही घटना दोन राजे आणि दोन राज्ये यांच्यात घडलेली आहे. त्या दोघातील एक राजा अत्यंत सात्त्विक साधुप्रवृत्तीचा होता. त्याला त्याच्या प्रजेकडून खूप सन्मान मिळत असे. कारण त्याची प्रजा अत्यंत सुखी होती. दुसरा राजा मात्र त्याच्या अगदी विरुद्ध प्रजेत देखील अत्यंत अप्रिय होता. शेजारच्या राज्यातील प्रगती, समृद्धीबद्दल तो अत्यंत मत्सरी होता. तेथील शांतता त्याला बघवत नव्हती. तो चांगला राजा हा श्रीकृष्णाचा एक चांगला भक्त होता. एकदा एका सकाळी तो राजा नेहमीप्रमाणेच पूजाअर्चा व ध्यान धारणेत मग्न असतानाच शेजारच्या दुष्ट राजने आक्रमण केल्याची बातमी आली. कृष्णभक्त राजाची सर्वांना सक्त ताकीद होती की तो पूजा अर्चा करत असताना कोणीही व्यत्यय आणायचा नाही. मग कारण काहीही असो. राज्यावर आक्रमण झालेले असताना नुसतेच पाहात बसणे आणि काही कृती न करणे हे सैन्य आणि सेनापती यांना शक्य नव्हते. राजाच्या कोणत्याही प्रकारच्या परवानगी शिवायच त्यानी प्रती हल्ला चढवला. त्या लढाईत त्या आक्रमण करणाऱ्या राजाचा पूर्ण पराभव झाला आवि लढाई संपली. त्या हरलेल्या राजाला बंदिबान करुन भक्त राजाच्या राज्यात आणण्यात आले. तेवढ्या वेळात राजाची पूजाआर्चा संपवून तो मंदिराबाहेर आला. त्या बंदी बनवलेल्या राजाला विजयी राजाच्या समोर आणण्यात आले. परंतु त्याला पकडून आणणाऱ्या सर्वांनाच आश्चर्य वाटले की तो अजिबात घाबरलेला नव्हता. अथवा त्याला आपल्या सीरक्षेची मुळीच काळजी नव्हती. अत्यंत निर्भयपणे न कचरता त्याने त्या विजयी राजाला तो काळ शुर वीर कोठे आहे ते विचारले आणि त्याला हजर करण्यास



सांगितले. कारण त्या काळ्या शूर योद्धयाने अक्षरशः एकट्याने त्याच्या सैन्याचा पाडाव केला होता आणि एवढ्या मोठ्या सैन्याला हरवले होते. त्या बंदिवान राजाने आपले राज्य, सर्व संपत्ती ह्याचा त्याज त्या विजयी राजासाठी करण्याची तयारी दर्शवली. मात्र जर त्याला तो अतुलनीय शौर्य गाजवणारा वीर दाखवला तर. त्या विजयी राजाला तत्क्षणी समजले की तो शूर, योद्धा छोटा होता. तो पुढे आला आणि त्याने त्या बंदिवान राजाला मिठी मारली. तो विजयी राजा हरलेल्या राजाला जास्त सुदैवी समजत होता. कारण त्याला प्रत्यक्ष त्यांचे 'भगवंतांचे' दर्शन घडले होते. त्यांच्यातील वैरभाव संपला होता आणि तो मत्सरी राजा एका शुद्ध भक्तात परावर्तीत झाला होता. हा असतो अद्‌भुत परिणाम फक्त त्याच्या दर्शनाचा अगदी शत्रुच्या रुपात झालेल्या दर्शनाचाही!

* * *

# पन्ना दाई

महाराणा संग उर्फ संग्रामसिंग हा चितोडचा राजा होता. खांडव्याच्या लढाईत झालेल्या पराभवानंतर तो लगेचच मरण पावला. बादशहा बाबर; त्याच्या प्रबळ सैन्यामुळेच खांडव्याची लढाई जिंकू शकला. भारतीय सैन्य त्या मानाने तेवढे प्रबळ नव्हते. महाराणाचे पहिले दोन पुत्र करण आणि विक्रमजीत हे त्यानंतर लगेचच मृत्यू पावले. फक्त त्याचा तिसरा पुत्र उदय हाच जिवंत राहिला. परंतु तो अल्पवयीन होता आणि राजा बनण्यास अयोग्य होता. ह्या परिस्थितीचा फायदा उठवत बनबीर नावाच्या एका दूरच्या नातेवाईकाने सिंहासन बळकावले आणि स्वतःलाच राणा-राजा म्हणून घोषित केले. स्वतःचे आसन स्थिर ठेवण्यासाठी, सुरक्षित ठेवण्यासाठी त्याने उदयला ठार मारायचे ठरवले. उदयची एक पन्ना नावाची दाई होती तिला ह्या कटाचा सुगावा लागला. तिने छोट्या झोपलेल्या उदयला एका मोठ्या टोपलीत ठेवले. ती टोपली पाना फुलांनी भरलेली होती. ती टोपली तिने एका विश्वासू माणसाच्या स्वाधीन केली आणि त्याला ती त्याच राजघराण्यातील एका इमानी सरदाराच्या स्वाधीन करण्यात आली. त्या सरदाराला त्या टोपलीसकट चितोड गडाच्या एका गुप्त दरवाजाने बाहेर पाठवण्यात आले आणि इकडे पन्ना दाईने आपल्या उदय एवढ्याच वयाच्या मुलाला उदय राजासारखे कपडे घालून उदय राजाच्या जागेवर झोपवले. तिचा असा तर्क होता की तिचा मुलगा हा राजाची सेवा करण्यासाठी जन्माला आला होता. प्रसंगी वेळ पडल्यास राजासाठी मृत्यूही आला तरी हरकत नाही आणि आता असा निर्णायक क्षण आला होता, की राजासाठी प्राण अर्पण करण्याची संधी मिळणार होती. तिची मानसिक आणि इतर तयारी पूर्णही झाली नव्हती तोच बनबारी हातात खंजीर घेऊन तेथे हजर



झाला. आणि त्याने भयानक आवाजात दरडावून उदय कोठे आहे असे विचारले, पन्नादाई उजव्या हाताने डोळे झाकत डाव्या हाताने बिछान्याकडे संकेत केला. तत्क्षणी त्या दुष्टाने तो खंजीर त्या झोपलेल्या इवल्याशा निरागस मुलाच्या शरीरात खुपसला. झोपेतल्या झोपेतच तो मुलगा 'आई' असे कळवळला आणि गतप्राण झाला. रक्ताने माखलेला खंजीर घेऊन बनबीर खोलीच्या बाहेर पडला. पन्नादाई आपल्या प्राणापेक्षा प्रिय मुलाच्या अंगावर कोसळली. रक्ताच्या थारोळ्यात पडून ती आतल्याआत हुंदके देऊन रडू लागली.

जेम्स टॉड नावाच्या एका इतिहासकाराने लिहून ठेवले आहे की पन्नादाईचा हा स्वार्थत्याग राजस्थानच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. आणि याबाबत कोणाचेही दुमत असणार नाही.

उदय राजा हा एका सरदाराच्या घरी वाढला आणि नंतर चितोडच्या सिंहासनावर त्याला बसवण्यात आले.

* * *

# बिरबल १

सम्राट अकबराच्या दरबारातील बिरबल हा अत्यंत हजरजबाबी, विनोद सरदार होता. अकबराच्या दरबारातील नवरत्नामधील एक होता. त्याने अकबराच्या दरबारात प्रवेश कसा मिळवला त्याची ही गोष्ट. एकदा बिरबल लाल किल्ल्यात प्रवेश करत होता. तेव्हा दारावरील एका पहारेकऱ्याने त्याला अडवले आणि आत प्रवेश करण्यासाठी तो बिलबलाने पहारेकऱ्याला वचन दिले की त्याला अकबराच्या दरबारात जे मिळेल त्यातील अर्धा वाटा तो त्या पहारेकऱ्याला देईल. बिरबल दरबारात गेला. तेथे तो काहीतरी विनोद बोलला. अकबराला मौज वाटली. तेव्हा अकबराने बिरबलाला बक्षीस देऊ केले. बिरल तयारच होता. त्याने अकबरला विनंती केली की मला पाठीवर चाबकाचे शंभर फटके द्यावे. दरबारात हजर असलेल्या सर्व लोकांना खूप आश्चर्य वाटले. ते विचार करत राहिले की हा माणूस दिसतो तर चांगला शहाणा पण वागतोय मात्र वेड्यासारखा. मात्र बिरबल फटक्यांसाठी हट्टच धरुन बसला.

आश्चर्य चकीत झालेल्या अकबराने नोकराला अगदी हळूच काठीचा शंभरवेळा स्पर्श करण्यास सांगितले. जेव्हा फटके पन्नास पर्यत पोहोचले बिरबलाने त्या पहारेकऱ्याला थांबावयास सांगितले आणि अकलराला सांगितले त्याच्या या शिक्षेत त्याला एक वाटेकरी आहे. असे सांगून त्याने सर्व कथा राजाला सांगितली. सर्व प्रकार अकबराच्या लक्षात आल्यावर त्याने त्या भ्रष्ट पहारेकऱ्याला बोलावले आणि पन्नास फटके लगावले आणि त्याला नोकरीवरुन काढून टाकले. अशाप्रकारे बिरबलाच्या दरबारातील कारकिर्दीची सुरुवात झाली.

* * *

# बिरबल २



एकदा एका भयंकर पावसाळ्यात आग्र्यात प्रचंड पाऊस पडत होता. सम्राट अकबर आग्र्यात किल्ल्याच्या सज्जात पाऊस बघत उभा होता. त्याच्याबरोबर त्याच्या आवडता दरबारी बिरबलही होता. ते दोघेही पडणाऱ्या पावसाचे सौंदर्य बघत होते. आग्रा किल्ल्याच्या जवळच एक तंबाखूचे शेत पसरलेले होते. अकबर स्वतः तंबाखु ओढत नसे. परंतू त्याला माहीत होते की बिरबल तंबाखू ओढतो आणि जेव्हा तो अकबरापासून दूर असे तेव्हा हे व्यसन करीत असे त्या तंबाखूच्या शेतात गच्च पानांमध्ये एक गाढव अगदी निश्चय उभे होते. ते पावसात भिजत होते. परंतू जराही हालत नव्हते. गाढवे अशीच करतात. अकबराला बिरबलाला चिडवण्याची लहर आली. तो म्हणाला, बिरबला ते पाहिलेस का? गाढवासारखा प्राणीसुद्धा तंबाखूला स्पर्शही करत नाही. बिरबलाने तत्काळ हजरजबाबीपणे उत्तर दिले. हो जहाँपन्हा आणखीसुद्धा असे काही प्राणी आहेत जे तंबाखूला स्पर्शही करत नाहीत. अकबर खळखळून हसू लागला आणि त्याने बिरबलाला प्रेमाने आलिंगन दिले.

* * *

# बिरबल ३

बिरबल ही एक अशी व्यक्ती होती की जिला आत्मविश्वास होता आणि प्रसंगी अप्रिय मतेही बादशहाच्या तोंडावर स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य होते. अर्थातच विनोदी पद्धतीने तो हे सांगत असे. तो कधीही अकबरापुढे तोंडपूजेपणा करत नसे आणि म्हणूनच अकबरला तो अत्यंत प्रिय होता. त्यामुळेच दरबारातील इतर लोक त्याचा मत्सर करत असत. एकदा दरबारातील कामकाज संपल्यानंतर गप्पांसाठी थोडासा वेळ उरला. अकबराने विचारले बिरबल खरं सांग कोण जास्त शक्तिमान, सामर्थ्यवान आहे. देव की मी? क्षणाचाही विलंब न लावता बिरबलाने उत्तर दिले. जहाँपन्हा अर्थातच तुम्ही ! त्या मत्सरी



दरबारातीजनांना बरे वाटले चला आता तरी बिरबलाला बादशाहाची स्तुती करताना रंगे हात पकडले. त्यांनी हसत हसत बिरबलाचा गळा चिरायचे ठरवले ते खदखदून हसू लागले. बिरबलाच्या उत्तराचे अकबरालाही आश्चर्य वाटले. परंतु त्याला माहित होते की, बिरबलाच्या बोलण्यात काहीतरी निश्चितच छूपा अर्थ दडलेला असतो. त्याने विचारले, बिरबला हे कसे शक्य आहे? मी कसा काय देवापेक्षा श्रेष्ठ आहे? शक्तीमान आहे? बिरबल नेहमीच्याच शांतपणे म्हणाला जहाँपन्हा समजा तुमच्याविरुद्ध एखाद्याने तुमच्या राज्यात बंड केले तर किंवा एखद्या उद्धट व्यक्तिने एखादे वाक्य तुमचा उपमर्द करणारे उच्चारले तर तुम्ही त्याला तुमच्या राज्यातून हद्दपर करु शकता. कता कि नाही? बादशहाने उत्तर दिले, 'निश्चितच!'

'परंतु भगवंत मात्र तसे करु शकत नाही.'

अशा तऱ्हेने युक्तिपूर्ण आपल्या शब्दांच्या जादुच्या सहाय्याने बिरबलाने अकबराच्या सापळ्यातून स्वतःची सुटका करुन घेतली आणि निराश झालेले मत्सरी दरबारी लोक फक्त बघत राहिले.

* * *

**राजा राष्ट्रकृतं पापं राज्ञः पापं पुरोहितः।**
**भर्ताच स्त्रीकृतं पापं शिष्यपापं गुरुस्तथा॥**

प्रजेचे पाप राजाला भोगावे लागते. राजाचे पाप पुरोहिताला भागावे लागते, पत्नीचे पाप पतीला भोगावे.

आता ट्युबमध्येही उपलब्ध

# शतधौत घृत

उपयुक्त आयुर्वेदिक क्रिम

**क्रिम कसे वापरावे** : प्रथम चेहरा किंवा त्वचेवर ज्या ठिकाणी क्रिम लावावयाचे आहे तो भाग स्वच्छपाण्याने धुवून घ्यावा. क्रिम हलक्या हाताने मसाज करून जिरवावे. सकाळी व संध्याकाळी लावावे.




**तजेलदार नितळ कांतीसाठी** : अत्यंत उपयुक्त क्रिम, उष्णतेमुळे होणारे त्वचेचे विकार, जळवात, त्वेचेची आग होणे, वातामुळे त्वचा भेगाळणे, त्वचा रूक्ष होणे, चेहऱ्यावरील मुरूम पुटकुळ्या यावर गुणकारी क्रिम.

**(ALL PURPOSE AYURVEDIC CREAM)**

Manufactured by-

**Vatsal Ayurvedic Products (P) Ltd.**
430A, Shriram Wadi, M.G. Road,
Nashik-420 001.

For distribution in Belgaum Contact - 09225112214